Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। गुरुवार, दि. ४ जून २०२६ । वर्ष १ । अंक ६० । पाने २।
DIGITAL EDITION



नसीब में होगा तो उछलकर आयेगा

(पान २ वर)

## ✓ » Selected

### आ. अमोल जावळे बांधावर; पंचनामे करण्याचे निर्देश

यावल | प्रतिनिधी: रावेर आणि यावल तालुक्यात १ जून रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर रावेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल (कल्पना हरिभाऊ) जावळे यांनी नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. यावल तालुक्यातील विविध गावांमध्ये भेटी देत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे केळी, कापूस, मका तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती दिली. अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे आडवी पडल्याने शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरल्याचे विदारक चित्र पाहायला मिळाले.

## यवतमाळ, अमरावती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीचे पारडे जड

# विधान परिषद रणधुमाळीत महायुतीचा दबदबा!

## सहा मतदारसंघांत विजयाचे चित्र स्पष्ट, बंडखोरी शमली, विरोधकांना मोठे धक्के,

**जन सम्राट टाईम्स**

मुंबई : राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकांची रणधुमाळी रंगात आली असतानाच महायुतीने सहा महत्त्वाच्या मतदारसंघांत विजयाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकल्याचे चित्र समोर आले आहे. उमेदवारी अर्ज छाननी संख्याबळाच्या राजकारणामुळे कोकण, सोलापूर, यवतमाळ, अमरावती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांत महायुतीची स्थिती अधिक मजबूत झाली आहे.

कोकण मतदारसंघात शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार अनिकेत तटकरे यांचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तक्षेपानंतर महायुतीतील मतभेद दूर झाल्याचे दिसून आले.

सोलापूरमध्ये काँग्रेसचे उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांचा अर्ज तांत्रिक कारणामुळे बाद ठरल्याने महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत यांचा विजय निश्चित मानला जात आहे. या मतदारसंघात महायुतीकडे




४२८ मतांचे मजबूत संख्याबळ असल्याने विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. यवतमाळमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी अपुऱ्या संख्याबळामुळे निवडणुकीतून माघार घेतली. एकूण ४४६ मतदारांपैकी केवळ १३१ मते मविआकडे असल्याने त्यांनी स्पर्धेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

अमरावतीत भाजपचे बंडखोर उमेदवार विप्लव बजोरिया यांचा अर्ज छाननीदरम्यान बाद झाल्याने महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्यासमोरील अडथळा दूर झाला आहे. येथे महायुतीकडे २२२ तर महाविकास आघाडीकडे १४८ मते आहेत. नाशिक मतदारसंघात महाविकास आघाडीने अधिकृत उमेदवार न दिल्याने निवडणूक जवळपास एकतर्फी झाली आहे. महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना ६०३ पैकी ४५४ मतांचे पाठबळ मिळत असल्याने त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

### महाविकास आघाडीसमोर मोठे राजकीय आव्हान

छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघातही महायुतीतील अंतर्गत नाराजी निवळल्याचे दिसून आले आहे. शिवसेना नेते अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतल्याने भाजपचे अधिकृत उमेदवार सुहास शिरसाट यांचा मार्ग सुकर झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत अद्याप शिल्लक असली तरी आतापर्यंतच्या घडामोडींवरून विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा दबदबा स्पष्टपणे दिसून येत आहे. सहा महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये विजयाची चाहूल लागल्याने महायुतीच्या गोटात उत्साहाचे वातावरण असून, महाविकास आघाडीसमोर मोठे राजकीय आव्हान उभे राहिले आहे.एकूण ४४६ मतदारांपैकी केवळ १३१ मते मविआकडे असल्याने त्यांनी स्पर्धेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.


**जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज**

# जळगाव जिल्ह्यात अवकाळीचा कहर!

## शेतकऱ्यासह पाच जनावरांचा मृत्यू

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यात मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनच्या पहिल्याच दिवशी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटाने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच उष्णतेच्या तडाख्याने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर या नैसर्गिक आपत्तीने आणखी एक संकट कोसळले असून जिल्ह्यातील २८३ गावांमधील तब्बल ५ हजार ७८७ शेतकरी बाधित झाले आहेत. प्राथमिक अहवालानुसार सुमारे ३ हजार ५१९ हेक्टर क्षेत्रावरील केळी, लिंबू, पपई, मोसंबी आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अवकाळी संकटात पारोळा तालुक्यातील एका शेतकऱ्याचा वीज कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच पाच दुधाळ जनावरांचा मृत्यू झाला असून भडगाव तालुक्यात एका बैलाचाही वीज पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याशिवाय जिल्ह्यातील विविध भागांतील ५५ घरे आणि एका झोपडीचेही नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील केळी उत्पादकांना या वादळी पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. रावेर, मुक्ताईनगर, भुसावळ, यावल, चोपडा, भडगाव, पारोळा आणि इतर तालुक्यांतील केळी



बागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

### ६३८ हेक्टर क्षेत्रावरील केळी पिकांचे नुकसान

अनेक ठिकाणी केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडली असून फळधारणा झालेल्या बागाही जमीनदोस्त झाल्या आहेत. विशेषतः रावेर तालुक्यातील ८७ गावांमधील २ हजार ११४ शेतकऱ्यांचे १ हजार ५३५ हेक्टरवरील केळी पीक बाधित झाले आहे. तर मुक्ताईनगर तालुक्यातील १ हजार ७७ शेतकऱ्यांचे ६३८ हेक्टर क्षेत्रावरील केळी पिकांचे नुकसान झाले आहे. केवळ केळीच नव्हे तर लिंबू, पपई आणि मोसंबी बागांनाही वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला आहे.

# कार्यक्रमाहून परतताना काळाचा घाला; भीषण अपघातात दोन सख्या बहिणींचा मृत्यू

## दहिवद फाट्याजवळ पिकअप आणि छोटा हत्तीची समोरासमोर धडक; शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर

**जन सम्राट टाईम्स**

**चाळीसगाव| प्रतिनिधी:** चाळीसगाव तालुक्यातील दहिवद फाट्याजवळ झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील दोन सख्या बहिणींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. जयश्री राकेश शिंदे (वय १९) आणि नंदिनी राकेश शिंदे (वय १६) अशी मृत बहिणींची नावे असून या दुर्घटनेमुळे हिरापूर गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हिरापूर येथील रहिवासी राकेश शिंदे हे आपल्या कुटुंबासह मालेगाव येथे एका नातेवाईकाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर ते छोटा हत्ती वाहनातून आपल्या गावी परतत होते. दहिवद फाट्याजवळ



आल्यानंतर समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप वाहनाने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात मोठी मुलगी जयश्री शिंदे हिचा जागीच मृत्यू झाला. तर वडील राकेश शिंदे, आई, धाकटी मुलगी नंदिनी शिंदे आणि अन्य दोन जण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत जखमींना उपचारासाठी जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच गंभीर जखमी झालेल्या नंदिनी शिंदे हिचीही मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. त्यामुळे काही तासांच्या अंतराने दोन सख्या बहिणींना काळाने हिरावून नेल्याने शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घरातील दोन तरुण मुलींच्या अकाली निधनाने हिरापूर गाव शोकसागरात बुडाले असून ग्रामस्थ, नातेवाईक आणि मित्रपरिवारातून हळहळ व्यक्त केली जात आहे. कार्यक्रमाच्या आनंदातून परतणाऱ्या कुटुंबावर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी स्थानिक पोलिसांनी अपघाताची नोंद केली असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# भुसावळ पोलिसांनी ३ सराईत आरोपींना केली अटक

## सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपी जेरबंद, मुद्देमाल जप्त

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ । प्रतिनिधी :** भुसावळ शहरातील एका घरफोडी प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावत भुसावळ शहर पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुख्याध्यापकांच्या घरात झालेल्या चोरीप्रकरणी तीन सराईत आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीतील मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. पोलिसांच्या या जलद आणि प्रभावी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी भुसावळ शहरातील एका मुख्याध्यापकांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांवर डल्ला मारला




होता. घटनेची माहिती मिळताच भुसावळ शहर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखा आणि भुसावळ शहर पोलिसांच्या संयुक्त पथकाने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तपासादरम्यान संशयितांचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. रेल्वे स्थानक परिसरात सापळा रचून तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शौकत रफीक शहा (वय ४६, रा. भुसावळ), शौला उर्फ बिरेंद्र सुरेंद्र परमान (वय ४०, रा. बिहार) आणि जसवीरमित्र राज (वय ४२, रा. हरियाणा) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी घरफोडीची कबुली दिली. त्यानंतर चोरीतील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासात हे आरोपी सराईत गुन्हेगार असल्याची माहिती समोर आली असून त्यांच्या विरोधात इतर ठिकाणीही गुन्हे दाखल असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, आरोपींना भुसावळ न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या काळात आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल बाडगे, हवालदार गोपाल गणे, आकाश पाटील, विकास सातव, प्रशांत परदेशी, राहुल वानखेडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पथकाने केली.


# महिलासाठी क्रीडांगणे अधिक सुरक्षित होणार!

## सीसीटीव्ही अनिवार्य करण्याचे निर्देश

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई| प्रतिनिधी :** राज्यातील महिला खेळाडूंना सुरक्षित, सन्मानजनक आणि प्रोत्साहनपर वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडांगणांवर मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले आहेत. राज्यातील प्रत्येक क्रीडांगणावर मॉडेल स्वच्छतागृहे, स्वतंत्र चेंजिंग रूम, पुरेशी प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा उभारण्यासाठी राज्यस्तरीय एकसंध धोरण तयार करण्यात यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत सन २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने महिला खेळाडूंसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा आढावा घेण्यात आला. बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार चित्रा वाघ, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, क्रीडा व युवक सेवा आयुक्त दीपक सिंगला यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, महाराष्ट्रातील महिला खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. त्यांच्या सहभागात आणि कामगिरीत अधिक वाढ व्हावी यासाठी सुरक्षित आणि सुसज्ज क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महिला खेळाडूंना स्वच्छतागृहे, चेंजिंग रूम, प्रकाशयोजना आणि सुरक्षा व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा मिळाल्यास



त्यांना अधिक आत्मविश्वासाने सराव आणि स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. राज्य शासनाने नव्या क्रीडा धोरणाद्वारे खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारला असून ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आधुनिक पायाभूत सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण, आर्थिक पाठबळ, पोषण, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि सुरक्षित वातावरण या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

### सुरक्षित आणि सुसज्ज क्रीडा सुविधा उपलब्ध

महाराष्ट्रातील महिला खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. त्यांच्या सहभागात आणि कामगिरीत अधिक वाढ व्हावी यासाठी सुरक्षित आणि सुसज्ज क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अधिक आत्मविश्वासाने सराव आणि स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. राज्य शासनाने नव्या क्रीडा धोरणाद्वारे खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारला असून ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

**जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज**

# नव्या कर्जमुक्ती योजनेत 12.71 लाख शेतकऱ्यांना मर्यादित दिलासा

## ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती’ योजनेचा शासन निर्णय जारी

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई/पुणे | प्रतिनिधी :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या सुमारे ३६ हजार कोटी रुपयांच्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती’ योजनेचा शासन निर्णय जारी झाला असून, या योजनेमुळे राज्यातील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा दावा सरकारने केला आहे. मात्र, प्रत्यक्षात दोन लाख रुपयांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या १६ लाख ४८ हजार शेतकऱ्यांनाच संपूर्ण कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याने या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. शासन निर्णयानुसार, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची थकबाकी दोन लाख रुपयांपर्यंत असल्यास त्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे १६.४८ लाख शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील ‘महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना’चा लाभ घेतलेल्या सुमारे १२ लाख ७१ हजार शेतकऱ्यांसाठी वेगळ्या अटी लागू करण्यात आल्या आहेत. या शेतकऱ्यांचे नव्याने थकीत झालेले कर्ज कितीही असले तरी, त्यांना प्रथम ५० हजार रुपयांपेक्षा जास्त असलेली थकबाकी स्वतः भरावी लागणार आहे. त्यानंतरच त्यांना जास्तीत जास्त ५० हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे. यामुळे मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना अपेक्षित




कर्जमाफीचा लाभ मिळणार नसल्याची भावना व्यक्त होत असून, अनेक शेतकरी संघटनांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. सरकारच्या मते, कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (वन टाइम सेटलमेंट) आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभ अशा तीन घटकांमुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. दोन लाखांपेक्षा जास्त थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांनाही दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळू शकणार आहे.दरम्यान, या योजनेवर विरोधी पक्ष आणि शेतकरी संघटनांनी जोरदार टीका केली आहे. सरकारने ‘सातबारा कोरा’ करण्याचे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात जाचक अटी-शर्ती लावून अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षांच्या मते, ही योजना पूर्ण कर्जमाफी देणारी नसून मर्यादित आर्थिक मदतीची योजना आहे. "शेतकऱ्यांची क्रूर थट्टा करणारी ही योजना असून निव्वळ दिखावा आहे," अशी टीका विरोधकांनी केली आहे.

### ७१ हजार शेतकऱ्यांसाठी वेगळ्या अटी लागू

प्रत्यक्षात दोन लाख रुपयांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या १६ लाख ४८ हजार शेतकऱ्यांनाच संपूर्ण कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याने या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. शासन निर्णयानुसार, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची थकबाकी दोन लाख रुपयांपर्यंत असल्यास त्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे १६.४८ लाख शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील ‘महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना’चा लाभ घेतलेल्या सुमारे १२ लाख ७१ हजार शेतकऱ्यांसाठी वेगळ्या अटी लागू करण्यात आल्या आहेत. या शेतकऱ्यांचे नव्याने थकीत झालेले कर्ज कितीही असले तरी, त्यांना प्रथम ५० हजार रुपयांपेक्षा जास्त असलेली थकबाकी स्वतः भरावी लागणार आहे.

## गुलाबराव पाटील यांची पुन्हा खदखद, शायरीतून व्यक्त केली नाराजी

# नसीब में होगा तो उचलकर आयेगा

## मुलाला विधान परिषदेची उमेदवारी न मिळाल्याची सल कायम

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांची नाराजी पुन्हा एकदा उघडपणे समोर आली आहे. आपल्या मुलाला विधान परिषदेची उमेदवारी मिळावी यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करूनही यश न आल्याने मनात साचलेली खदखद त्यांनी जाहीर कार्यक्रमातून शायरीच्या माध्यमातून व्यक्त केली. "नसीब में होगा तो उचलकर आयेगा और नसीब में नही होगा तो आकर चला जायेगा," या ओळींमधून गुलाबराव पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करत राजकीय वर्तुळात चर्चांना पुन्हा एकदा उधाण आणले आहे. विधान परिषद निवडणुकीची जागा महायुतीमध्ये भाजपच्या वाट्याला गेल्याने शिवसेना शिंदे गटाची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे आपल्या चिरंजीव प्रतापराव पाटील यांना आमदार करण्याचे स्वप्न सध्या तरी अपूर्ण राहिल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. जाहीर कार्यक्रमात बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले की, अनेक जण मला विधान परिषद उमेदवारीबाबत प्रश्न विचारतात. मात्र, आयुष्यात जे नशिबात असेल ते मिळतेच. आणि जे नशिबात नसेल ते समोर येऊनही निघून जाते. त्यामुळे प्रारब्धावर आणि देवाच्या इच्छेवर विश्वास ठेवला पाहिजे. कदाचित देवाच्या मनात यापेक्षाही मोठे आणि चांगले काहीतरी असेल, असे सूचक विधान त्यांनी केले. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना राजकारण करताना विचारधारा विसरू नये, असा सल्लाही दिला. "राजकारण करा, पण भगव्या विचारांचा प्रकाश कधीही सोडू नका. जनतेने मला आमदार केले, मंत्री केले म्हणूनच आज मी सामाजिक कार्य करू शकतो आणि लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे," असे ते म्हणाले. दरम्यान, प्रतापराव पाटील यांना उमेदवारी मिळावी यासाठी गुलाबराव पाटील यांनी अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न सुरू ठेवले होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत त्यांनी मुंबईत मुक्काम ठोकला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची तीन ते चार वेळा भेट घेऊन त्यांनी आपल्या मुलासाठी उमेदवारीची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, महायुतीच्या जागावाटपात भाजपने ही जागा सोडण्यास नकार दिल्याने त्यांच्या पदरी निराशा आली. याचा परिणाम जळगावमधील राजकीय घडामोडींवरही दिसून आला.



### देवाच्या इच्छेवर विश्वास ठेवला पाहिजे

विधान परिषद निवडणुकीची जागा महायुतीमध्ये भाजपच्या वाट्याला गेल्याने शिवसेना शिंदे गटाची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे आपल्या चिरंजीव प्रतापराव पाटील यांना आमदार करण्याचे स्वप्न सध्या तरी अपूर्ण राहिल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. जाहीर कार्यक्रमात बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले की, अनेक जण मला विधान परिषद उमेदवारीबाबत प्रश्न विचारतात. मात्र, आयुष्यात जे नशिबात असेल ते मिळतेच. आणि जे नशिबात नसेल ते समोर येऊनही निघून जाते. त्यामुळे प्रारब्धावर आणि देवाच्या इच्छेवर विश्वास ठेवला

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी ज

# पतित पवन संघटनेच्या मुख्य प्रवक्तेपदी अली दारूवाला

## माध्यमांसमोर संघटनेची भूमिका मांडणार

जन सम्राट टाईम्स



**पुणे। प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्ते अली दारूवाला यांची पतित पवन संघटना, महाराष्ट्रच्या मुख्य प्रवक्ते तथा अधिकृत टीव्ही पॅनेलिस्टपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सोपानराव देशमुख आणि प्रदेश सरचिटणीस नितीन सोनटक्के यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पतित पवन संघटना ही हिंदू समाजाचे हक्क, प्रतिष्ठा, अस्मिता आणि सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी कार्यरत असलेली संघटना आहे. महाराष्ट्रातील हिंदू समाजाच्या उन्नतीसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात संघटना सक्रिय आहे. मुख्य प्रवक्ते आणि अधिकृत टीव्ही पॅनेलिस्ट म्हणून अली दारूवाला हे मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल तसेच दूरदर्शन माध्यमांसमोर संघटनेची अधिकृत भूमिका मांडणार आहेत. विविध सामाजिक आणि सार्वजनिक विषयांवरील चर्चांमध्ये ते संघटनेचे प्रतिनिधित्व करतील. या नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना अली दारूवाला म्हणाले की, “मी सुन्नी मुस्लिम समाजातून येत असून, माझ्या माहितीनुसार पतित पवन संघटनेत ही जबाबदारी स्वीकारणाऱ्या मुस्लिम समाजातील पहिल्या सदस्यांपैकी एक आहे. ही नियुक्ती विविध समाजघटकांमध्ये विधायक संवाद आणि परस्पर सहकार्याला चालना देणारी आहे.” संघटनेच्या नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी ही जबाबदारी समर्पित भावनेने पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे या नियुक्तीमुळे सामाजिक आणि वैचारिक पातळीवर विविध समाजघटकांमध्ये संवाद वाढविण्याच्या दृष्टीने एक सकारात्मक संदेश गेल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# ५ हजारांची लाच घेताना पुरवठा निरीक्षक जेरबंद

## अधिकाऱ्यावर भ्रष्टाचाराचा गुन्हा

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** शासनाच्या ज्वारी खरेदी प्रक्रियेत मदत करण्याच्या मोबदल्यात ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना धुळे तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष महेश बागुल (वय ३०) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची धक्कादायक घटना बुधवारी उघडकीस आली. या प्रकरणी त्याच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धुळे तालुक्यातील अंचाडे येथील शेतकरी तक्रारदार आणि त्यांच्या पत्नी यांनी शेतात उत्पादित केलेली ज्वारी शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यानंतर ज्वारीची खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ते धुळे येथील शासकीय गोदामात गेले होते. यावेळी पुरवठा निरीक्षक मनिष बागुल यांनी तक्रारदाराला बाजूला घेऊन ज्वारीचा दर्जा चांगला दाखवून मोजणी करण्यासाठी आणि ऑनलाइन बिल प्रक्रियेत अडथळा न आणण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. "लाच दिली नाही तर ऑनलाइन बिल टाकले जाणार नाही," अशी धमकीही त्यांनी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या मागणीमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्याने थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर पोलीस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक यशवंत बोरसे यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचण्यात आला. बुधवारी सापळा कारवाईदरम्यान मनिष बागुल याने तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्याला रंगेहात पकडले. त्यानंतर त्याच्याविरोधात धुळे शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत पोलीस निरीक्षक पद्मावती कलाल यांच्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. शासकीय खरेदी प्रक्रियेत लाच मागणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध झालेल्या या कारवाईमुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, शासकीय, निमशासकीय किंवा अन्य कोणत्याही कार्यालयात कामासाठी लाचेची मागणी झाल्यास तात्काळ विभागाशी संपर्क साधावा.

### कायद्याच्या कलम 7 अन्वये गुन्हा दाखल

या प्रकरणी त्याच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे तालुक्यातील अंचाडे येथील शेतकरी तक्रारदार आणि त्यांच्या पत्नी यांनी शेतात उत्पादित केलेली ज्वारी शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी केली होती.

# अंगणात झोपलेल्या वृद्ध महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरणारी टोळी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; चार आरोपी अटकेत, चोरीचे चार गुन्हे उघडकीस

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी :** अंगणात झोपलेल्या वयोवृद्ध महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरून पसार होणाऱ्या चार जणांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी अटक केली आहे. आरोपींकडून चोरीसाठी वापरण्यात आलेल्या दोन मोटारसायकलींसह चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे मंगळसूत्र चोरीचे चार गुन्हे उघडकीस आले आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, 31 मे 2026 रोजी शिंदखेडा तालुक्यातील अमराळे येथील रहिवासी सतीश सुभाष पाटील यांच्या आई अंगणात खाटेवर झोपलेल्या असताना मध्यरात्री दोनच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे 5 ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून मोटारसायकलवरून पलायन केले होते. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या





गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना गुप्त माहिती मिळाली की, सरवड फाटा परिसरात काही संशयित युवक दोन मोटारसायकलींसह थांबले असून त्यांचा मंगळसूत्र चोरीच्या घटनांशी संबंध आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक चेतन मुंढे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक रवाना करण्यात आले. पथकाने मुंबई-आग्रा महामार्गावरील सरवड फाटा परिसरात सापळा रचून वैभव चतुर बोरसे (वय 21, रा. नगाव), मुस्तफा जुमा पिंजारी (वय 20, रा. नगाव), धिरज बालूसिंग गिरासे (वय 20, रा. खलाणे, ता. शिंदखेडा) आणि भुषण रमेश पाटील (रा. नवे कोडदे, ता. शिंदखेडा) या चौघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी अमराळे आणि होळ (ता. शिंदखेडा) परिसरात घडलेल्या मंगळसूत्र चोरीच्या तीन घटनांची कबुली दिली. तसेच अधिक तपासात आरोपींनी नवलनगर, धुळे येथून एक मोटारसायकल चोरी केल्याचीही कबुली दिली. चोरीची मोटारसायकल त्यांनी गोंदूर रोड परिसरात लपवून ठेवली होती. तीही पोलिसांनी जप्त केली आहे. या कारवाईमुळे शिंदखेडा तालुक्यातील मंगळसूत्र चोरीच्या घटनांचा उलगडा झाला असून नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती कमी झाली आहे.

# जैन सेना युवाच्या वतीने संजय दराडे यांचा सत्कार

## जैन समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा



जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** राष्ट्रीय जैन सेना युवा संघटनेच्या वतीने पुणे शहराचे सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित या भेटीप्रसंगी जैन समाजाच्या कल्याण, प्रगती आणि सामाजिक हिताशी संबंधित विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय जैन सेना युवा संघटनेचे अध्यक्ष ओम प्रवीण ओसवाल यांनी सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांची भेट घेऊन विविध सामाजिक विषयांवर संवाद साधला. समाजहिताच्या प्रश्नांवर प्रशासनाशी समन्वय राखण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वपूर्ण ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले. चर्चेदरम्यान सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांनी जैन सेना युवा संघटनेच्या कार्याचा आढावा घेत युवा अध्यक्ष ओम प्रवीण ओसवाल यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. समाजातील युवकांनी विधायक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी जैन सेना युवा संघटनेचे कार्यकर्ते प्रणव जैन, कार्तिक ठक्कर, कविश मेहता, विनायक जैन, मन जैन यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# तरुणाची आत्महत्या?; मृतदेह कंपनीच्या गेटसमोर ठेवत ग्रामस्थांचे ठिय्या आंदोलन

## तीन महिन्यांपासून पगार न दिल्याचा आरोप; दोन तासांच्या चर्चेनंतर आंदोलन

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** धुळे तालुक्यातील चिंचवार गावात एका २० वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी संबंधित कंपनीविरोधात आक्रमक भूमिका घेतली. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या त्रासामुळे आणि तीन महिन्यांपासून पगार न मिळाल्यानेच तरुणाने आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप नातेवाईक आणि ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ तरुणाचा मृतदेह कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर ठेवत ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन छेडले.

मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल रवींद्र माळी (वय २०) या तरुणाने मंगळवारी रात्री कंपनीलगतच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच चिंचवार गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आणून कंपनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत आंदोलन सुरू केले. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील अनेक युवक संबंधित दारूगोळा निर्मिती कंपनीत कार्यरत आहेत. मात्र कंपनीतील काही अधिकाऱ्यांच्या कथित हुकूमशाही आणि उद्धट वर्तनामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता.

मृत गोपाल माळी याला गेल्या तीन महिन्यांपासून पगार देण्यात आला नव्हता, असा आरोपही ग्रामस्थांनी केला. याच मानसिक तणावातून त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचा दावा करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल रवींद्र माळी (वय २०) या तरुणाने मंगळवारी रात्री कंपनीलगतच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच चिंचवार गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली.

त्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आणून कंपनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत आंदोलन सुरू केले. घटनेची माहिती मिळताच सोनगीर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी लावून धरली. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पोलीस, कंपनी प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यात जवळपास दोन तास चर्चा झाली. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि तरुणावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणामुळे चिंचवार गावासह संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, आत्महत्येमागील नेमके कारण काय, याचा तपास पोलीस करीत आहेत. ग्रामस्थांनी केलेल्या आरोपांबाबत कंपनी प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# जळगावात सुट्या खाद्यतेलासह शीतपेयांचा दीड लाखांचा साठा जप्त

## पाचोरा आणि चाळीसगाव येथे अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** जिल्ह्यात अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने मोठी धडक कारवाई करत सुट्या स्वरूपात विक्रीस ठेवलेले खाद्यतेल आणि मानकांनुसार नसलेल्या शीतपेयांचा तब्बल १ लाख ५५ हजार ६४० रुपयांचा साठा जप्त केला आहे. पाचोरा आणि चाळीसगाव येथे करण्यात आलेल्या या स्वतंत्र कारवायांमुळे अन्न व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून, अन्न सुरक्षा नियमांची अंमलबजावणी अधिक कठोर करण्यात येणार असल्याचा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे. अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या माहितीनुसार पाचोरा तालुक्यातील वरखेडी-वाघोडे परिसरात तपासणी मोहीम राबविण्यात आली. या वेळी रिफाइन्ड सोयाबीन तेल पॅकिंगविना आणि अन्न सुरक्षा मानक कायद्याचे उल्लंघन करून खुल्या स्वरूपात विक्रीस ठेवण्यात आल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत तेलाचे नमुने तपासणीसाठी जप्त केले तसेच ४४८ किलो खाद्यतेलाचा साठा ताब्यात घेतला. या साठ्याची किंमत ८० हजार ६४० रुपये असल्याचे प्रशासनाने सांगितले. या प्रकरणी संबंधित



उत्पादक आणि पुरवठादारांची चौकशी सुरू करण्यात आली असून अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, चाळीसगाव शहरात विनापरवाना शीतपेय विक्री करणाऱ्या व्यावसायिकाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ‘मॉन्स्टर एनर्जी’ आणि ‘झिरो एनर्जी मॉन्स्टर एनर्जी अल्ट्रा’ या कार्बोनेटेड कॅफिनयुक्त शीतपेयांचे नमुने मानकांनुसार नसल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. अधिकाऱ्यांनी ३५० मिलीचे ४८० कॅन आणि १२० कॅन असा एकूण ७५ हजार रुपयांचा साठा जप्त केला. संबंधित उत्पादनांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून विक्री परवान्यांबाबतही अनियमितता आढळल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी संबंधित पुरवठादार आणि उत्पादकांविरोधात कारवाईसाठी सूचना देण्यात आल्या असून बाजारात वितरित करण्यात आलेला साठा परत मागविण्याबाबत उत्पादक कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहआयुक्त (अन्न) एस. आर. करकाळे यांच्या देखरेखीखाली पार पडली. सहायक आयुक्त (अन्न) दीनानाथ शिंदे तसेच अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बाविस्कर, शरद पवार आणि योगराज सूर्यवंशी यांनी कारवाईत सक्रिय सहभाग घेतला.

### 75 हजार रुपयांचा साठा जप्त

तपासणीदरम्यान ‘मॉन्स्टर एनर्जी’ आणि ‘झिरो एनर्जी मॉन्स्टर एनर्जी अल्ट्रा’ या कार्बोनेटेड कॅफिनयुक्त शीतपेयांचे नमुने मानकांनुसार नसल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. अधिकाऱ्यांनी ३५० मिलीचे ४८० कॅन आणि १२० कॅन असा एकूण ७५ हजार रुपयांचा साठा जप्त केला. संबंधित उत्पादनांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून विक्री परवान्यांबाबतही अनियमितता आढळल्याचे सांगण्यात आले.

# शिंदे गटाला फटका देण्याची ठाकरेंची तयारी?

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** विधान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात शिंदेसेनेला फटका देण्यासाठी ठाकरे गटाने जोरदार तयारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली... भाजपाचे चार प्रभावशाली नेते लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली... शेतकऱ्यांनी भाजपाला मतदान करू नये, असे विधान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना केले... विधान परिषद निवडणुकीतून महाविकास आघाडीच्या उमेदवाराने अचानक माघार घेताच राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली.... आगामी काळात लाडकी बहीण योजनेतून आणखी ५० ते ६० लाख महिलांची नावे कमी केली जाऊ शकतात, असा दावा जयंत पाटील यांनी केला. धान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात शिंदेसेनेला फटका देण्यासाठी ठाकरे गटाने जोरदार तयारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली. नाशिकमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला रोखण्यासाठी ठाकरे गट भाजपाच्या बंडखोर उमेदवारांना बळ देणार असल्याची राजकीय वर्तुळात रंगली. भाजपाच्या मदतीने हा डाव रचला गेल्याचे सांगितले जाजत आहे. त्याबाबत माध्यमांनी खासदार संजय राऊत यांना प्रश्न विचारला असता निकालाच्या वेळी याची स्पष्टता होईल,